**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५८/२०२०** **दिनांक २१/०७/२०२०** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १५/०७/२०२० ते २१/०७/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २२/०७/२०२० सकाळी ८:३० पासून २६/०७/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५/०७ | १६/०७ | १७/०७ | १८/०७ | १९/०७ | २०/०७ | २१/०७ | | २२/०७ | २३/०७ | २४/०७ | २५/०७ | २६/०७ |
| ३५.२ | ५९.० | ४७.० | १३.० | २२.० | - | - | **पाऊस (मिमी)** | १० | १२ | १४ | १० | ४ |
| ३३.० | ३३.४ | ३४.० | ३२.० | ३२.६ | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३४ | ३५ | ३५ | ३६ |
| २४.० | २४.६ | २५.० | - | २४.२ | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २६ | २६ | २६ | २६ | २६ |
| ४ | ४ | ६ | ६ | ६ | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ८४ | ८६ | ९४ | - | ९० | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९० | ९० | ९० | ९१ | ९० |
| ८२ | १६ | ७८ | ८७ | ८३ | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७० | ६५ | ७१ | ७९ | ७२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | १.९ | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | ७ | ६ | ६ | ५ |
| शांत | शांत | शांत | शांत | प. | - | - | **वाऱ्याची दिशा** | द. | प. | द. | नै.द. | नै.द. |

**हवामान सारांश/ ईशारा**

**प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार ठाणे जिल्ह्यात दिनांक २२ ते २६ जुलै, २०२० दरम्यान बऱ्याच ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहील.**

**ईशारा: दिनांक २४ ते २६ जुलै, २०२० दरम्यान ठाणे जिल्ह्यासाठी पाउसाविषयक कोणताही ईशारा नाही.**

**विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक २६ जुलै ते १ ऑगस्ट, २०२० दरम्यान सरासरीपेक्षा कमी पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पुर्नलागवड** | • हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता बाह्य स्तोत्रातून पाण्याची उपलब्धता करून भात पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत.<br>• पुढील पाच दिवस हलक्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता आणि पुर्नलागवड केलेल्या भात पिकास पाण्याचा ताण पडण्याची शक्यता असल्याने शक्य असल्यास उपलब्ध बाह्य स्त्रोतातून पाणी घेवून पाण्याची पातळी २.५ ते ५.० सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात खाचरातील बांध तणमुक्त ठेवावेत जेणेकरून किडींच्या खाद्य वनस्पतीचा समूळ नायनाट केल्याने भात पिकावर किडींचा प्रादुर्भावावर आळा घालण्यास मदत होईल. |
| **नागली** | **पुर्नलागवड** | • हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नागली पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • हापूस आंब्यामध्ये वर्षाआड फळे धरण्याचा गुणधर्म १० वर्षानंतर प्रकर्षाने दिसून येतो. यासाठी पूर्ण वाढलेल्या (१० वर्षावरील) हापूस आंब्याला दरवर्षी नियमित फळे धरण्यासाठी झाडाच्या विस्ताराचा पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर व्यास मोजून त्याची सरासरी काढून विस्ताराच्या प्रति मीटर व्यासास ३ मि.ली. या प्रमाणात कल्टारची (पॅक्लोब्युट्राझोल) मात्रा पाऊसाची तीव्रता कमी असताना दयावी. पॅक्लोब्युट्राझोलची आवश्यक मात्रा ३ ते ५ लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या बुंध्याभोवती विस्ताराच्या निम्म्या अंतरावर १० ते १२ सें.मी. खोल असे सम अंतरावर २५ ते ३० खड्डे मारून समप्रमाणात ओतावे, नंतर खड्डे मातीने बुजवून टाकावे. पॅक्लोब्युट्राझोल देण्यापूर्वी झाडाभोवती असलेले तण काढून टाकावे. पाऊसाची तीव्रता कमी असताना पॅक्लोब्युट्राझोलची आळवणी करावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **वाढीची अवस्था** | • काकडी, पडवळ, दुधीभोपळा, तांबडा भोपळा, दोडका, कारली इ. वेलवर्गीय पिकांवर ढगाळ वातावरणामुळे भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. रोगामुळे पानांवर दोन्ही बाजूनी पांढऱ्या भुकटीच्या स्वरूपातील बुरशीची वाढ दिसून येते. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कार्बेन्डेझीम ५ ग्रॅम किंवा झायनेब २० .ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते दयावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**